INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

शिवकालीन सामाजिक परिस्थिती

(Social situation during the time of Shivaji Maharaj)

डॉ. मोहन काळकुटे
इतिहास विभाग प्रमुख,
महिला कला महाविद्यालय, बीड

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/03.2023-58563425/IRJHIS2303008

प्रस्तावना :

मध्ययुगीन कालखंडात स्वराज्यातील समाज अनेक जाती उपजाती असा विभागला गेला होता. तसेच जाती उपजातीमध्ये परस्परांतील भेदभाव वाढत असे. धर्मशास्त्रातील वर्णव्यवस्था येथील जातीला लागू पडत नव्हती. उच्च वंश, कुळ, पंथ, व्यवसाय इत्यादी घटकांवरून जातीयता वाढलेली होती. सहभोजन, आंतरजातीय विवाह याबाबीवर फार कडक निर्बंध लावण्यात आलेले होते. प्रत्येक जमातीसाठी तिची एक जातीयता निर्माण झाली होती. सतराव्या आणि अठराव्या शतकातील मराठ्यांच्या इतिहासात महाराष्ट्रातील जातीतील लोकांना एका उदात्त ध्येयासाठी एकत्र आणलेले दिसून येते. किल्ल्यातील कारभारासाठी ब्राह्मण, मराठा आणि कायदेस्थ प्रभू अशा तीन विविध अधिकऱ्यांची नेमणूक शिवरायांनी केली. त्यांनी जातीय व्यवस्थेत फारसे महत्त्व दिले नाही.

1) **उद्दिष्ट** : -

शिवकालीन सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

2) **कालखंड** : -

या शोध निबंधाचा कालखंड शिवकाळापुरता मर्यादित राहील.

3) **संशोधन पध्दती** : -

या शोधनिबंधाचे लिखाण ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करून करण्यात आले आहे.

शिवकाळात समाजात अनेक जाती, उपजाती आणि जमाती होत्या. त्यामध्ये ब्राह्मण, मराठा, कोळी, सुतार, साळी, माळी, लोहार, मुस्लिम, वंजारी, वाणी, तेली, जंगम, गोंधळी, सोनार, गुरव, महार, मांग, चांभार इत्यादी प्रमुख जाती होत्या. महार, मांग, चांभार या जातीचा समावेश अतिशूद्र आणि अस्पृश्य या नावाने केलेला आढळतो.

शिवकाळात समाजात ब्राह्मणांना आदराचे स्थान होते. समाजात विविध जाती, जमातींना मिळालेल्या सामाजिक हक्काबाबत त्यांच्यात जागरूकता केली होती. समाजातील वर्ण व्यवस्थेच्या वाहिवाटीप्रमाणे सामाजिक व्यवहार चालू असल्याचे आपल्या शिवकालीन कागदपत्रातून दिसून येते. शिवकालीन महाराष्ट्रातील हिंदू समाज जातीनिहाय असला तरी वरिष्ठ लोक आपला वर्ग, धर्म सोडून कनिष्ठ वर्णाच्या लोकांचे व्यवसाय अथवा उद्योग करीत असत. तरीही त्यांचे स्थान उच्च दर्जाचे

समजण्यात येत असे.

अस्पृश्यता ही परंपरेने चालत आलेली होती. त्यामुळे फलटणचा बजाजी निंबाळकर मुसलमान झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांचे शुद्धीकरण करून त्यांना पुन्हा स्वधर्मात घेतले. यासाठी जिजाबाईंनी पुढाकार घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली मुलगी सखुबाई हिचा विवाह बजाजी निंबाळकर यांचा मुलगा शहादजी निंबाळकर याच्याशी केला होता. याशिवाय मुस्लिम धर्म स्वीकारलेल्या नेताजी पालकर, बाजीप्रभू देशपांडे पुत्र श्यामजी यांचे शुद्धीकरण करून त्यांना परत हिंदू धर्मात घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांचे हे कार्य म्हणजे रुढीपरंपरे विरोधी बंड करणारे होते.

मोगली सत्तेचा कारभार हा जनतेवर लादलेला जुलमी सत्तेचा कारभार होता. पण छत्रपती कारभार हा जाती, धर्म निरपेक्ष तत्त्वावर आधारलेला असल्याने सामान्य जनतेच्या हिताचा होता व त्याला जनतेचा पाठिंबा होता. साऱ्या प्रजेने राजधुरा आपल्या हातात घेतली हे गावकऱ्यांपासून पंतप्रधानापर्यंत सर्व जातीच्या व धर्माच्या लोकांचा समावेश होता हे यावरून दिसून येते. सैन्यात हिंदूचा भरणा होता. तरी तोफखाना मुसलमानांच्या हातात होता. आरमारत मुसलमान, हिंदू, भंडारी व कोळी लोकांचा भरणा होता. स्वराज्यात शांतता सुव्यवस्था लाभल्याने जनतेत विश्वास उत्पन्न झाला. सर्व जाती धर्मीयांना राज्यकारभार चालविण्यासाठी संधी मिळाल्याने जनतेचे खरे राज्य सुरू झाले.

शिवाजी महाराजांच्या नवीन स्थापन झालेल्या राज्यात थोड्याच वेळात अशी राज्यपद्धती अमलात आली की, जीच्या वरून अमात्य म्हणतात त्याप्रमाणे इतरांनी धडे घ्यावे. याचे कारण मुख्यत: राजा आणि त्याचे सरदार आपल्या कामात अत्यंत दक्ष, प्रलोभनात बळी न पडणारे न्यायास स्मरून काम करणारे होते.

मराठी लष्करात अनेक महारांनी सैनिक म्हणून कामगिरी बजावली होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर 20 फेब्रुवारी 1707 मध्ये छत्रपती शाहूंची सुटका झाली आणि त्यांना साताऱ्याच्या गादीवर बसविण्यात सिद्धनाथ महार तिसरा याचा मोठा सहभाग होता. मराठी राज्याचे संरक्षण व शाहू राजपथावर बसविण्याच्या कामगिरीमुळे शाहू महाराजांनी सिद्धनाथ महार यास तात्कालीन वाई प्रांतातील खुळक (कळकी) हे गाव वतन म्हणून दिले.

स्त्रीची शिक्षणापासून अनेक शतकांपूर्वीच फारकत झालेली होती. आठव्या वर्षी विवाह होणाऱ्या बालवधूकडून शिक्षणाची अपेक्षा बाळगणे चुकीचे. राज्यघराण्यातील स्त्रियांना मात्र अक्षर असल्याचे दिसून येते. काही मोजक्या स्त्रियांना शिक्षण मिळत होते. काही स्त्रियांना युद्ध कला, घोड्यावर बसणे व प्रशासनाचे धडे मिळत असत. जिजाबाई व ताराबाई, येसूबाई यांचा प्रशासनात नावलौकिक होता. अर्थात ही उदाहरणे अपवादात्मक असून सामान्य स्त्री वर्ग अशिक्षित किंबहुना निरक्षर होता.

गावकीच्या वतनदार मंडळीत पाटील हा प्रमुख असे. गाव सभेचा तो प्रमुख असे. पाटील हा मराठा जातीतील असे. काही ठिकाणी ब्राह्मण, जैन, लिंगायत अथवा अन्य जातीतील देखील पाटीलकीचे वतन असे. महार जातीकडेही पाटीलकी असल्याची उदाहरणे मिळतात. याचे उदाहरण म्हणजे वाई परराज्यातील बागेवाडी गावची पाटीलकी वाघनाथ महाराकडे होती. वाई परराज्यातील जुनी पाटीलकी मूळची महाराकडे होती.

निष्कर्ष : -

1) छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात जातीयतेला थारा दिलेला नव्हता.

2) शिव काळातील समाज अनेक जाती उपजातीने विभागलेला होता.

3) शिवकाळात राजघराण्यातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता.

4) शिवकाळात अनेक गावांचे पाटील हे महार जातीतील होते असे दिसून येते.

5) शिवकाळात सर्व जाती धर्मीयांना राज्यकारभारात संधी मिळत असे.

संदर्भ ग्रंथसूची :

1) कुलकर्णी अ. रा., अशी होती शिवशाही, राजहंश प्रकाशन, पुणे - 1999.
2) गवळी पी. ए., मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद- 1998.
3) प्रा. सावंत बी. एस., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर- 1997.
4) प्रा. मोरे दिनेश, शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद- 2004.
5) प्रा. बिरादार टि. के., मराठ्यांचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, लातूर- 2000.